# वाहतुक पोलीस की चौकातले दरोडेखोर वाचा पुढील अंकात!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
MO.9860898564
संपादक - दिपक थोरात

**जिल्हा रुग्णालयाची अवस्था पाहून खा. सोनवणे आक्रमक जिल्हा शल्यचिकित्सक अशोक बडेंचा फोन दुसऱ्याकडे सरप्राइज भेट रुग्णांच्या हिताचे प्रयत्न खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी पहिले चांगले काम करत आपल्या कामाची पद्धत दाखवून दिली आहे.**

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२६२ | शुक्रवार दि.१४ जुन २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -262 | FRIDAY DT. 14 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# डॉ साबळे, थोरात यांच्या कार्यकाळातल्या कोवीड साहित्य घोटाळा प्रकरणी नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे दिल्लीत चौकशीची मागणी करणार का?

## डॉ सुरेश साबळे यांना पुन्हा बीडचा जिल्हा शल्यचिकित्सक व्हायचे आहे अजित पवारांची काही दिवसांपूर्वी भेट घेतल्याची चर्चा?




- खासदार बजरंग सोनवणे यांना कोविड कार्यकाळातील भ्रष्टाचाराचे पुरावे आम्ही देऊ? विद्यमान जिल्हा शल्यचिकित्सक अशोक बडे च्या विरोधात थोरात साबळेनी
- अंधारातून काड्या करायला सुरुवात केल्याची चर्चा जिल्हा रूग्णालयात थोरात साबळे च्या बगलबच्च्यान कडून चाय पे चर्चा?
- ११० कोटी बोगस कोविड साहित्य, इमारत दुरुस्तीच्या निधी खर्चबाबत खा. बजरंग सोनवणे बोलणार का?
- तिनशे कोटीच्या निधीचा हिसाब कोण देणार आणि कोण घेणार..?
- सुमारे ३०० कोटीच्या प्रशासकीय मान्यता विविध कार्यकाळामध्ये जिल्हा रुग्णालयातून गेलेल्या प्रस्तावाला मंजुरी पालकमंत्री, तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी मंजूर या दिल्या होत्या पण संबंधित निधी कसा खर्च केला याचा हिसाब यावेळी नक्कीच या सर्व प्रकरणाचा
- भ्रष्टाचाराचा नक्कीच हिसाब बाहेर नक्कीच येईल कारण संबंधित जिल्हा रुग्णालयाच्या तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक थोरात साबळे गीते यांच्यापैकी त्या प्रश्नाचे उत्तर नसणार आहे?
- खा. बजरंग सोनवणे ला थोरात, साबळे बजरंग बप्पा सोनवणेच्या कानात काय बोलले आणि बप्पानी सरकारी दवाखान्यात इंन्ट्री मारली अचानकच?
- डॉ सुरेश साबळे अशोक थोरात सूर्यकांत गीते यांच्या विरोधात तक्रारीचे काय झाले याची चौकशी खा. बजरंग सोनवणे यांनी करणे गरजेचे?
- बीड जिल्हा रुग्णालयात एन्ट्री मारून बजरंग सोनवणे बजरंग सोनवणे समस्या जाणून घेतल्या.?
- खासदार बजरंग सोनवणे कामाला सुरुवात केल्याची चर्चा रंगू लागले.?

बीड /प्रतिनिधी

नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे यांनी गुरुवार सायंकाळी जिल्हा रुग्णालयास सरप्राइज भेट दिली. यावेळी रुग्णालयाची अवस्था पाहून ते संतापलेले दिसून आले. यावेळी अतिरिक्त शल्यचिकित्सक डॉ. नागेश चव्हाण यांना ते बोलताना जिल्हा शल्यचिकित्सक कुठे गेले आहेत हे विचारत

फोन केला शल्यचिकित्सक डॉ. अशोक बडे यांना फोन लावण्याचा प्रयत्न केला परंतु कॉल फॉरवर्ड असल्याचे आढळून आले. खासदार बजरंग सोनवणे यांनी दोन दिवस जनतेसाठी देऊन हारतुरे स्विकारण्यात वेळ न घालवता प्रत्यक्ष कामाला सुरुवात केलीलीदिसून आले आहे. गुरुवारी सायंकाळी जिल्हा रुग्णालयाला सरप्राइज भेट दिली. यावेळी परिसराची अवस्था तसेच घाणीचे साम्राज्य दिसून आलं आरोग्य सुविधांमध्येही त्रुटी आढळून आल्याने खासदार सोनवणे चांगलेच संतापलेले दिसले शल्यचिकित्सक डॉ. अशोक बडे यांना बोलावले परंतु ते घरी



असल्याचे समजले. फोन लावला तर तोही फॉरवर्ड होता. यामुळे संतप्त खासदार बजरंग सोनवणे यांनी बडेंना घरीच रहा म्हणत रुग्णांच्या सेवेत कुचराई सहन करणार नाही असे म्हटले. तर रुग्णालयाची अवस्था पाहून अतिरिक्त शल्यचिकित्सक डॉ. नागेश चव्हाण यांना खडे बोल सुनावले. ही परिस्थिती सुधारण्याच्या सूचना दिल्या तसेच दुसऱ्या वेळी हीच अवस्था दिसली तर कारवाईसाठी तयार रहा अशी तंबी दिली. येथील गैरसोयी बद्दल आरोग्य मंत्र्यांना पत्र देणार असल्याचे म्हटले आहे. खासदारांची भेट रुग्णांच्या हिताची ठरणार अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.



## अजित पवारांची राष्ट्रवादीला भ्रष्टाचार या साबळे, थोरात, गितेसह अन्य अधिकाऱ्यांना वाचविण्याच्या तयारीत?

बीड जिल्हा रुग्णालयात कोट्यावधी रुपयाचा कोविड साहित्य खरेदी घोटाळा करत असताना बीड जिल्हा रुग्णालयांतर्गत कार्यकाळामध्ये कोवीड सेंटर किती उभा केले होते व जिल्हा रुग्णालया अंतर्गत बीड जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीला किती पैसे खर्च केले होते. एक काम किती वेळा झाले या सर्वांची सविस्तर माहिती यावेळी बीड जिल्हा रुग्णालयाचे तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ अशोक थोरात डॉ सुरेश साबळे डॉ सूर्यकांत गीते सह अन्य कर्मचारी यांनी कसा पैसा खर्च केला यावरती सविस्तर हिसाब बीडचे नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे यांनी घेतला पाहिजे तर यावेळी बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे व महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांची भेट घेऊन संबंधित लोकांवरती झालेल्या कारवाईबाबत ही चौकशी करण्यात यावी. यावेळी बजरंग सोनवणे यांनी राज्याच्या आरोग्य मंत्री तानाजी सावंत व पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी बीड जिल्ह्यासाठी बीड जिल्हा रुग्णालयातील घोटाळा प्रकरणांमध्ये राजकीय वरदहस्त लाभलेले अशोक थोरात सुरेश साबळे सूर्यकांत गीते यांच्या प्रकरणांमध्ये सखोल चौकशी करून फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात यावा संबंधित बिल्डिंग रिपेरिंग साठी व कोविड साहित्य खरेदी करीत असताना गुत्तेदार कोण होते संबंधित निधी खर्च करताना त्यावेळेस ची शरद पवारांची राष्ट्रवादी आणि आजची अजित पवारांची राष्ट्रवादी याच्यामध्ये कोण कोण अधिकारी नेते मंडळी म्हणून मिरवत आहेत. हे बीड जिल्ह्याला माहीत असून अशोक थोरात सुरेश साबळे सूर्यकांत गीते यांची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. संबंधित कार्यकाळातले ऑडिट जनतेसमोर मांडणे ही गरजेचे आहे?

बीड जिल्ह्यातील विविध प्रश्नांपैकी एक आरोग्याचा प्रश्न असलेले बीड जिल्हा रुग्णालयांमध्ये नवनिर्वाचित खासदार तानाजी सावंत यांनी इंन्ट्री मारून त्या ठिकाणी संबंधित बीड जिल्हा रुग्णालयात तीन समस्या जाणून घेतल्या संबंधित अधिकारी यांना धारेवर धरले परंतु धारेवर धरणे अगोदर त्यांनी बीड जिल्हा रुग्णालयात औषध पुरवठा नसल्याने अनेक रुग्णांना बाहेरून औषध आणावा लागत असल्याचे चित्र त्यांना दिसले नसेल का त्यांनी केंद्र व राज्य सरकारला पत्र व्यवहार करून संबंधित महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर अशोक बडे यंत्रणेला पाठपुरावा करणे व जाब विचारणे की बीड जिल्हा रुग्णालयामध्ये रुग्णांची हे साड का होत आहे यामध्ये जिल्हा रुग्णालयात आवश्यकता तुटवडा का भासत आहे याची सखोल चौकशी घेऊन शासन दरबारी मानून बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयामध्ये येणाऱ्या सर्व रुग्णांची औषधामुळे आर्थिक स्थळ लागत असल्याने त्या लोकांचे पैसे मेडिकल वाल्यांच्या घशात जात आहेत यामध्ये अनेक जणांची टक्केवारी आहे तेही त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे.?अशोक थोरात, सुरेश साबळे गिते,यांच्या कार्यकाळात झालेल्या कोविड निधी घोटाळा संदर्भात नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे हे बीड जिल्ह्यात किती निधी आला व तो कसा खर्च केला याची सखोल चौकशीसाठी बीडचे सिव्हिल ल सर्जन अशोक बडे यांच्याकडून संबंधित आकडा घेऊन जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद घेऊन जाहीर करतील का? कोविड घोटाळा नेमका काय आहे हे खासदार बजरंग सोनवणे योग्य पद्धतीने सांगू शकतील कारण सर्व जिल्हाधिकारी कार्यातून व जिल्हा रुग्णालयातून सर्व कागदपत्र समोर आल्याच्या नंतर सगळे सत्य बाहेर येऊन कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार करणारे थोरात साबळे यांचे पितळ नक्कीच उघडे पडेल यात तिळमात्र शंका नाही.?

# २५ वर्षाच्या राजकारणात पक्षनिष्ठ हीच आमची ओळख:-जगदीश गुरखुदे



२००९ साली केलेले लोकसभा निवडणुकी मधले काम असो किंवा २०१४ मधील निवडणुकीत मा. पंकजाताई यांच्या मुंडे साहेबांच्या प्रचारार्थ घेतलेल्या २२ कॉर्नर मीटिंग असो तसेच माळवेस भागात घेतलेली मुंडे साहेबांची सभा आम्ही स्वखर्चातून घेतलेली आहे पक्षाकडून आम्ही कधीही कुठल्याही स्वरूपाची आर्थिक किंवा अजून काही अपेक्षा ठेवलेली नाही पक्षनिष्ठा व मुंडे परिवारावर असलेले प्रेम याशिवाय दुसरे काहीही नाही प्रत्येक निवडणुकीत शहरातील यंत्रणा शहराध्यक्ष या नात्याने माझ्याकडे असावे अशी नेत्याची इच्छा असताना मी ती घेतली नाही कारण मी या गोष्टीत कधी पडलो नाही आणि कधी पडणार नाही. २०१४ सालीची पोट निवडणूक असो धोंडीपुरा भागात मा. प्रीतम ताई व स्वर्गीय मेटे साहेब यांचे सभा घेतली होती. या २०२४ च्या निवडणुकीत तर मी पूर्ण शहर पिंजून काढले माझा भाऊ परशुराम हा ग्रामीण भागात लक्ष देऊन होता आमच्या प्रयत्नांना यश आले नाही याच शल्य कायम मनात राहील.

एका वर्तमानपत्रात माझ्याबद्दल एक बातमी छापून आली त्यात आर्थिक व्यवहारात बद्दल माझा उल्लेख करण्यात आला जर मी कधी पक्षाशी कुठला आर्थिक व्यवहार केला असेल तर राजकारण सोडून देईल आज पर्यंत कधीही या गोष्टी मी बोललो नाही परंतु माझ्याबद्दल समाजात गैरसमज नको म्हणून आज प्रसिद्ध पत्रक काढण्याची वेळ आली.

ते आमचें नेते आहेत आम्ही त्यांच्या सोबत राहू पण नेत्यांच्या प्रत्येक फोटो मध्ये आम्ही आसाव्येत असा आम्ही कधीच प्रयत्न केला नाही आम्ही पक्षांचा कार्यक्रम असो किंवा व्यक्तीगत कार्यक्रम असो आम्ही वीना निमंत्रित कोणत्याच व्यासपीठावर (स्टेजवर) गेलो नाही आम्ही लोकांत बसून कीतेक कार्यक्रम केले आहेत त्यांच्या आम्हाला कधी कमीपणा वाटला नाही व खंतही नाही स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये नगरसेवक असल्याने माझे मतदान मी भाजप उमेदवार माननीय सुरेश धस यांना केले यातही मी कुठल्याच स्वरूपाचा आर्थिक व्यवहार केला नाही

# शेतकऱ्यांशी संवाद साधतांना आध्यक्ष मिलिंद घारड

## महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेचे टाकरवण येथे स्वागत

टाकरवण । प्रतिनिधी

समाज आर्थिक दृष्ट्या समृद्ध होण्याकरिता आर्थिक साक्षरता, आर्थिक शिस्त, आर्थिक बचत ही त्रिसूत्री महत्त्वाची आहे असे मत महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अध्यक्ष मिलिंद घारड यांनी व्यक्त केले. शेतकरी वर्गाला पिक कर्ज नुतनीकरण, व्याज परतावा तसेच शासनाच्या प्रोत्साहनपर योजनेचे महत्व पटवून सांगण्यासाठी व त्यांच्यासोबत संवाद साधण्यासाठी महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेचे रविवार (ता.०९) रोजी आगमन झाले यावेळी ते बोलत होते

महाराष्ट्र ग्रामीण बँक यांच्या संयुक्त विद्यमाने या संवाद यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या



कार्यक्रमाचे प्रस्तावि व्यावस्थापक प्रविण सोनवळकर यानी केले. यावेळी पथनाट्यातून आर्थिक साक्षरता, शेतीसाठीचे कर्ज, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना, बँकेच्या संदर्भात येणारे फसवणूकीचे खोटे संदेश आणि कॉल, एटीएम विषयी जनजागृती, अटल पेन्शन योजना, बँकेचे अपघात विमा तसेच बँकेकडून घेतलेले कर्ज वेळोवेळी फेडण्यासंदर्भात जनजागृती करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ऋषीकेश सुळे यांनी केले तर आभार स्वप्नील जेऊघाले यांनी मानले यावेळी गणपत आरबे, भागवत खुळे, लक्ष्मण लव्हाळे, दत्तात्रय वराट, दयानंद गोबरे, अनिरूध्द तौर, हणुमान वराट,बळीराम लव्हाळे, शैलेश तौर, चंद्रहंस गोबरे, पंढरीनाथ भुंबे, जनार्धन आडागळे, रज्जाक इनामदार, बळीराम लव्हाळे, लक्ष्मण गरड गावातील आजी माजी सरपंच, उपसरपंच, सोसायटी चेअरमन यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्यने उपस्थीत होते.

# संगीत क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवत घेतली भरारी !

शिरूर कासार । प्रतिनिधी

येथील ज्ञानाई संगीत विद्यालय संचलीत जामखेड मधील विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत भरारी घेतली असुन संगीत क्षेत्राची मान उंचावली असुन या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे .पंडीत उध्दवबापु आपेगांवकर यांचे शिष्य तालमणी हरिप्रसाद गाडेकर यांनी शिरूरमधील विद्यार्थ्यांना संगीताचे दालन म्हणून ज्ञानाई संगीत विद्यालय सुरू केले ,त्याच अंतर्गत जामखेडमधील विद्यार्थ्यांना देखील संगीत क्षेत्रातील वाटा दाखवल्या आहेत .जिवनाला आकार संगीतामुळे मिळतो तसेच शालेय अभ्यासाबरोबर संगीत कला आत्मसात केल्यास वेगळी ओळख निर्माण होत असते .अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मुंबई अंतर्गत असलेल्या सरस्वती संगीत विद्यालय धानोरा परिक्षा केंद्रावर हे विद्यार्थी



परिक्षेस बसले होते त्यात विशेष प्राविण्य मिळवत या विद्यार्थ्यांनी यश संपादीत केले .विराज सूर्यवंशी ,स्वराज चकोर , अद्वैत होळकर , प्रणव लोंढे ,मनोज तातेड ,वंश डोंगरे , सार्थक कुलकर्णी यांनी विशेष प्राविण्य मिळवले . दिलेले धडे व सरावात सातत्य ठेवल्याने हे यश विद्यार्थांना मिळाले असे तालमणी हरिप्रसाद गाडेकर यांनी सांगितले.संगीत साधकाचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री सह मा.नगराध्यक्ष रोहिदास पाटील,दत्ता पाटील ,पोदार ईंग्लिश स्कुलचे संचालक सागरशेठ अंदूरे, नितीनशेठ तवटे ,प्रशांतशेठ कानडे , डॉ.सुर्यवंशी, अमोल शेठ तातेड आदिंनी स्वागत व कौतुक केले .

# प्रस्थापित ओबीसी नेत्यांनो सावधान...!

एकेकाळी सर्व जात, धर्म, पंत विसरून रझाकारांच्या विरोधात लढलेला मराठवाड्यातील पुरोगामी विचारांचा बीड जिल्हा आता जातीयवाद करत असल्याचे नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीतून प्रकर्षाने जाणवले. हे आत्ताच झाले असे नाही तर २००९ च्या लोकसभा निवडणुकी पासून ओबीसी विरुद्ध मराठा अशी निवडणूक बीड जिल्ह्यातील मतदारांना पहायला मिळत आहे!

नुकत्याच पार पडलेली लोकसभा निवडणुकही त्याला अपवाद राहिला नाही तर यावेळी जातीयवादाने उच्चांक गाठत महायुती व महाविकास आघाडी जिंकण्यासाठी प्रयत्न करताना स्पष्ट दिसत होते आणि ही अत्यंत निंदनीय बाब आहे! नेहमी प्रमाणे सत्ताधारी प्रस्थापित ओबीसी व मराठा समाजकारणात व राजकारणात नसलेल्या भोळ्या भाबड्या विस्थापित ओबीसी व मराठा समाजातील लोकांना या राजकीय जातीय दरीत टाकून बळी पाडण्यासाठी प्रयत्नशील होता.कधीही राजकारण न करणारा विस्थापित मराठा व ओबीसी समाज बांधव स्वतःच्या समाजाचा खऱ्या अर्थाने आजपर्यंत काय मिळाले आणि काय नाही, याचं आत्मचिंतन आता करु लागला, असेच बीड लोकसभेच्या निकालातुन दिसले! जिल्ह्यात तीन नंबरची लोकसंख्या असलेल्या धनगर समाजाचा एकेकाळी बीड लोकसभेचा खासदार होता पण आजची धनगर समाजाची राजकीय परिस्थिती काय?

तर गेल्या ३५ वर्षापासुन ओबीसीतील ठराविक एकाच समाजाच्या छत्रछायेखाली असलेल्या बीड नगर पालिकेच्या ५२ सदस्य असलेल्या संख्याबळापैकी कोणत्याही पक्षाकडून गेल्या ३५ वर्षांपासून एकही धनगर समाजाचा सदस्य झाला नाही, नव्हे होऊ दिला जात नाही. याचा विचार धनगर समाजाचा सुशिक्षित युवा मतदार अंतर्मुख होऊन करु लागला आहे.

काही धनगर व माळी समाजाच्या संघटनाही आहेत, पण त्याही स्वतःच्या समाजापेक्षा प्रस्थापित ओबीसी असलेल्या थोरल्या आणि धाकल्या घराच्या फायद्यासाठीच आहेत, हेही लपून राहिलेले नाही ! आणि त्या प्रस्थापितांच्या फायद्यासाठी काम केले नाही तर त्यांनाही अडचणीत आणण्यासाठी हे प्रस्थापित ओबीसी कोणत्याही स्तरावर जायला मागेपुढे पाहत नाहीत. म्हणजे एक प्रस्थापित ओबीसी बांधव तुपाशी असेल तर विस्थापित ओबीसी बांधवाला चटणी भाकरी तरी मिळाली पाहिजे ही भूमिका आजपर्यंत सत्तेत कायम बसलेल्या सदन ओबीसी समाजाच्या म्होरक्यांनी कधीच घेतली नाही.

खरंच सत्तेत वाटा नसणार्या ईतर ओबीसी बांधवांना बिलकुल कळत नसायला आजचा सुशिक्षित बेरोजगार विस्थापित ओबीसी तरुण आता काही अनपढ नाही. तो तरुण या सर्व नफ्या-तोट्याचा विचार विनिमय करु लागला आहे! का उगाच ओबीसी आहे म्हणून नेहमीच सत्तेत बसणार्या ओबीसी बांधवांना नाही रे वर्गातील ओबीसी बांधवांनी आणखी किती वर्षे हेच मढं उरावर घेऊन नाचायचं...? याचा विचार सत्तेत नसलेले ओबीसी मतदार कधी करणार आहेत का नाही ?बीडच्या थोरल्या प्रस्थापित ओबीसी घराने जो अन्याय केला तीच री पुढे ओढत परळीच्या धाकल्या प्रस्थापित ओबीसी घरानेही कायम पुढे चालू ठेवला. ३२ नगर परिषद सदस्य संख्या असलेल्या परळी नगर परिषदेत पण स्व.गोपीनाथराव मुंडे राजकारणात सक्रिय व्हायच्या अगोदरच धनगर समाजाचा १ व माळी समाजाचे २ सदस्य होते व आहेत व त्यांची संख्या त्याच्या पुढे कशी जाणार नाही याची काळजी नेहमीच आजपर्यंत घेतली गेली आहे!

अगदी २०१७ मध्ये परळी तालुक्यातील नागापूर जिल्हा परिषद सर्कलमध्ये धनगर समाजाच्या प्रदिप दिलीप बीडगर यांना भाजपने उमेदवारी दिली होती व त्याच्या विरोधात वंजारी समाजाच्या प्रदिप मुंडेना राष्ट्रवादीने उमेदवारी दिली होती, पण या निवडणुकीत बीडगर यांच्या विरोधात मुंडेचा दोन्ही पक्षातील प्रस्थापित समाज एकत्र झाला आणि बीडगर यांचा पराभव केला होता, हे परळी तालुक्यातील सर्व जनतेने उघड्या डोळ्यांनी बघीतले आहे. तसेच बीड तालुक्यातील पिंपळनेर जिल्हा परिषद सर्कलमध्ये २००७ साली धनगर समाजाचे गोरख शिंदे हे शिवसेनेचे उमेदवार होते तर राष्ट्रवादी काँग्रेसने १० गावात १० घरं नसलेल्या तेली समाजाचे चंद्रकांत पेंढारे हे उमेदवार दिले होते. त्यावेळी शिंदेचा पराभव करण्यासाठी मोठ्या क्षीरसागरांनी सर्व राजकीय ताकद पणाला लावून शिंदेना पराभूत केले होते, हेही बीड तालुक्यातील जनतेने बघीतले होते. नंतर २०१७ मध्ये बहिरवाडी जिल्हा परिषद गटाच्या निवडणुकीत काँग्रेस आयने कुणबी मराठा समाजाचे अशोक हिंगे यांना तिकीट दिले होते तर शिवसेनेने धनगर समाजाच्या नवनाथ प्रभाळे यांना उमेदवारी दिली होती तर राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (काकु नाना) आघाडीने तेली समाजाच्या सुरेखा क्षीरसागरांना उमेदवारी दिली होती.

सरासरी समाजाचेच राजकारण बघायचे झाले तर प्रत्येक गांवात मराठा समाजाची लोकसंख्या किमान ४० % संख्या आहे तर या निवडणुकीत हिंगे हे विजयी व्हायला हवे होते. पण तसे अजिबात घडले नाही तर सरसकट गावात (काही अपवाद वगळता) कमीत कमी पाच व जास्तीत जास्त ३० घरे असलेल्या धनगर समाजाचे प्रभाळे विजयी व्हायला हवे होते! पण घडले ते उलटेच! दहा गावात तेली समाजाचे दहा घरं नसतानाही सुरेखा क्षीरसागर प्रचंड मतांनी विजयी झाल्या होत्या. याची उमज सत्तेत नसणार्या ओबीसी बांधवांना आता चांगलीच यायला लागली आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. का उगाचच लगीन आहे लोकांचं आणि नाचतयं येड्या भोकाचं ही भुमिका घेऊन विस्थापित ओबीसी बांधव आता उर बडवून घ्यायला काय दुधखुळा राहिला नाही. आपण आता आपल्या स्वतःच्या समाजाच्या पुढील पिढ्यांचं राजकीय व सामाजिक नुकसान करून घेणार नाहीत, ही भुमिका आता विस्थापित ओबीसी तरुण जागा होऊन घेऊ लागला आहे. विस्थापित ओबीसी आता स्वतःच्या जातीचं स्वतः अस्तित्व निर्माण करण्यासाठी प्रयत्न करु लागला आहे व दबक्या आवाजात म्हणू लागला आहे, 'आपण कोणालाच त्रासदायक ठरलो नाही तर आपला विचार कोणीच करणार नाही.' जिल्ह्यात चार नंबरचा समाज असलेल्या माळी समाजाची पण अजिबात वेगळी परिस्थिती नाही. माजी आ. भिमराव धोंडे प्रथम कॉग्रेसचं काम करत होते, पण प्रथम विधानसभा उमेदवारीसाठी कॉग्रेस पक्षाचे तत्कालीन सत्ताधारी यांच्याकडे मागूनही नाकारली होती. म्हणून त्यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणूक लढविली होती. त्या पहिल्या निवडणुकीत धोंडेंना तत्कालीन सक्षम विरोधी पक्ष असलेल्या शेकापने निवडणूकीत पाठींबा दिला होता म्हणून ते निवडून निवडणूक सहजपणे जिंकले होते.



तेव्हा कुठे भीमराव धोंडेंच्या रुपाने समाजाला राजकीय पटलावर जिल्ह्यात तालुका लोकप्रतिनिधी बघायला मिळाला. कालांतराने ते कॉंग्रेस, राष्ट्रवादी व्हाया २०१४ ला भाजपमध्ये गेले व जिंकलेही, पण नंतर२०१९ ला त्यांचा पराभव झाला होता. तर परवाच्या नगर लोकसभा निवडणुकीच्या प्रचारानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या जामखेडच्या सभेत महाराष्ट्र भाजपचे सर्व्हेसर्वा व राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडववणिसांनी आष्टी-पाटोदा विधानसभेचे उमेदवार म्हणून स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाचे विद्यमान आमदार सुरेश धसांच्या नावाची घोषणा करून भाजपने पुन्हा धोंडेंचेही पंख कोणाच्या सांगण्यावरून छाटले, हेही उमजायला मार्ग नाही.

सत्तेतील थोरल्या व धाकल्या प्रस्थापित घरातील जे आरोग्य व शिक्षण सभापती, जिल्हा परिषद उपाध्यक्ष झाले ते कालांतराने आमदार झालेले जिल्ह्यातील जनतेने पाहिले आहे. मात्र, माळी समाजाचे जेष्ठ नेते कॉम्रेड पंढरीनाथ (बापू) लगड पण एक वेळा आरोग्य व शिक्षण सभापती झाले होते, नंतर ते आमदार किंवा खासदार सोडाच नंतर ते जिल्हा परिषद सदस्य सुद्धा झाले नाहीत, का होऊन दिले नाहीत हा पण विचार आजचा राजकारणाच्या बाहेरचा ओबीसी तरुण करु लागला आहे, असे म्हणायला हरकत नाही. बीडमध्ये राष्ट्रवादीचं कायम काम करत असलेले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष म्हणून काम करणाऱ्या अँड सुभाष राऊतांनाही वरीष्ठ पातळीवर दबाव आणल्याशिवाय स्थानिक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने किंवा स्थानिक नेतृत्वाने साधे बीड नगर परिषदेचे तिकिट दिले नाही.

हे काही लोकांना खरे वाटत नसेल तर कधी राऊतांना खाजगीत भेटुन विचारुन बघा, तुम्हाला नक्की सत्यता पडताळता येईल. याचा बदला आता झालेल्या लोकसभेत माळी समाजानेही घेण्याचा प्रयत्न केला, कारण समता परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते लोकसभा निवडणुकीचा प्रचार करताना कुठेही दृष्टीस पडले नाहीत. वरील दोन्ही समाजाचे कधी जिल्हा नियोजन समितीवर सदस्य किंवा ईतर कमेट्यावर सदस्य नसतात असले तरी ते औषधापुरतेच असतात! कधी काळी नाभिक समाजाचे स्वातंत्रसैनिक कॉम्रेड काशिनाथराव जाधव बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार होते, पण आज त्यांच्या समाजाचा साधा जिल्हा परिषद सदस्य किंवा पंचायत समिती सदस्य पण तूर्तास जिल्ह्यात नाही.

बहुसंख्य असलेल्या विस्थापित ओबीसीचे असे राजकीय व सामाजिक हाल आहेत तर कुंभार, कोष्टी, परीट, सुतार, लोहार, रंगारी, भावसार, लिंगायत वाणी, साळी, भविष्य सांगणारा जोशी समाज, गुरव, गोपाळ समाज, हिंदु, मुस्लिम कासार, मणियार, आतार, बागवान, नाथपंथी, गोसावी, डवरीगोसावी व ईतर सर्व छोट्या-छोट्या विस्थापित ओबीसी आणि भटके विमुक्त यांची राजकीय व सामाजिक व आर्थिक स्थिती किती दयनीय असेल ही कल्पना न केलेलीच बरी. बाकी गेवराई शहरात गेवराई ओबीसी विकास आघाडी उभी करणार्या प्रा. गणपतराव काकडेंना ओबीसी समाजाचे कार्य करताना प्रस्थापितांविरुद्ध लढा देताना किती त्रास झाला याचा अभ्यास आजचा विस्थापित ओबीसी तरुण जागृत होऊन करु लागला आहे. उशीरा का होईना पण आजचा विस्थापित ओबीसी तरुण जागा होताना दिसत आहे, हेही नसे थोडके!

माजलगांव, पाटोदा, आष्टी, शिरूर कासार, वडवणी इथेही वरील ओबीसी समाजाचे राजकीय लोकप्रतिनिधी तोंडी लावण्यापुरते पण का निवडुन येत नाहीत का किंवा निवडणुकीत उभेकेले जात नाहीत किंवा उभे राहिले तर स्थानिक पातळीवर विविध स्तरावरन दबाव आणून उभे राहू दिले जात नाही. याचा विचार सुज्ञ विस्थापित ओबीसी तरुण करु लागला आहे. दोन्ही प्रस्थापित ओबीसी नेत्यांपेक्षा मराठा समाजाचे आ. सुरेश धस कैकपटीने अधिक चांगले म्हटले तर कोणाला वाईट वाटण्याचे कारण नाही, कारण त्यांनी विविध समाजातील घटकांना न्याय मिळवून देण्याचा सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसत आहे. बीड जिल्हा परिषद अध्यक्षांची सर्वसाधारणसाठी जागा राखीव असताना पण वंजारा समाजाच्या सविता गोल्हारांना व सय्यद अब्दुल्लांना तर ओबीसींसाठी आरक्षित असताना डॉ. शिवाजीराव राऊतांना जिल्हा परिषद अध्यक्षपद बहाल केले, हीच अध्यक्ष निवडण्याची संधी दोन्ही प्रस्थापित ओबीसींना मिळाली असती तर त्या दोघांनीही स्वतःच्या कुटुंबांतील कसा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडता येईल, याकरीता निकराचे प्रयत्न केले असते, हे त्रिवार सत्य कोणीही लपवू शकणार नाही.

गेल्या ३५ वर्षापासून दोन्ही प्रस्थापित ओबीसी घरांनी जेवढे ओरबाडून खाता येईल तेवढं खाल्लं, याचीच उमज आजच्या विस्थापित ओबीसी नवतरुणांना झाली हे कालपरवा लागलेल्या बीड लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर स्पष्ट दिसून आले आहे. आता तरी प्रस्थापित ओबीसी पुढाऱ्यांनों, सावधान व्हा सर्वांना समान वागणूक देत रहा ..! अन्यथा ओबीसीतील छोटछोट्या विस्थापित ओबीसी जाती स्वतःचा राजकीय वाटा घेण्यासाठी तुमची वाट लावल्याशिवाय गप्प बसणार नाहीत, हेच खरे !

भाई आकाश निर्मळ
९४२२५३६९००

# लिंबागणेशकरांचा वारंवार खंडित वीजपुरवठ्याचा प्रश्न सुटला

## ट्रान्सफॉर्मर जळाला आणि २ तासातच नविन मिळाला :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानक परिसरातील ट्रान्सफॉर्मरची फ्युज पेटीची विजेच्या साहित्य अभावी कित्येक दिवसांपासून दुरावस्था होती. तुटलेली फ्युज,जळालेली केबल,पेटीला सुरक्षा कवच नव्हते त्यामुळे वारंवार रात्री अपरात्री वीजपुरवठा खंडित झाल्याने ग्रामस्थांना अंधारात रात्र काढावी लागत असे त्यामुळे नविनच फ्युज पेटी बसविण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी, हरिओम क्षीरसागर, कैलास गायकवाड, पांडुरंग वाणी, बशीर शेख,अभय वनवे यांनी उप अभियंता महावितरण कार्यालय लिंबागणेश विजय हुलकुडे यांना केली होती.त्यानंतर लगेचच मागणी मान्य करत नविन फ्युज पेटी बसविण्यात आली.त्यामुळे ग्रामस्थांनी सुटकेचा श्वास सोडला असुन वारंवार वीजपुरवठा खंडित होणार नाही व या परीसरातील दुध डेअरी मालक, बँक सुविधा फब्रीकेशन,दवाखाने व ईतर व्यावसायिक यांची अडचण काही प्रमाणात दुर होण्यास मदत होणार आहे.



ग्रामीण भागात ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. रात्र अंधारात काढावीच लागतो परंतु ईतर अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.महावितरणकडुन ट्रान्सफॉर्मर जळाला किंवा नादुरुस्त झाला तर ३ दिवसात बदलुन मिळेल म्हणत त्यासाठी स्थानिक मंडळ स्तरावरील कार्यकारी अभियंता व विभागाला माहिती देण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक ७८७५७६२००७ प्रसारित करण्यात आला असला तरी ३ दिवसात ट्रान्सफॉर्मर मिळेल याची खात्री देता येत नाही. मात्र लिंबागणेशकरांना याचा सुखद अनुभव आला असुन लिंबागणेश बसस्थानक येथील ट्रान्सफॉर्मर सायं ५ वाजता जळाल्याची माहिती डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी यांनी विजय हुलकुडे उप अभियंता महावितरण कार्यालय लिंबागणेश यांना दिल्यानंतर त्यांनी अवघ्या दोन तासात सायं ७ वाजता नविन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून दिला.आणि रात्री लगेचच नविन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला यासाठी महावितरणचे कर्मचारी वैष्णव सुरवसे, युवराज सुरवसे तसेच अंकुश गायकवाड,तुकाराम गायकवाड व सहकाऱ्यांनी रात्रीतुन ट्रान्सफॉर्मर बसविला.याबद्दल उप अभियंता विजय हुलकुडे यांचे ग्रामस्थांनी आभार मानले.

# धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध राहील-खा बजरंग सोनवणे

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघातून विजय झाल्यानंतर त्यांच्या पवनसुत निवासस्थानी धनगर समाज संघर्ष समिती व जिल्हाप्रमुख दत्ता वाकसे यांच्यावतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी सत्काराच्या प्रसंगी बीड जिल्ह्याचे नवनिर्माचित खासदार बजरंग सोनवणे म्हणाले की बीड जिल्ह्यातील धनगर समाजाच्या विविध प्रश्न व धनगर समाजाच्या जिव्हाळ्याचा असलेला एसटी अनुसूचित जमातीचा प्रश्न सोडवण्यासाठी व लोकसभेमध्ये मांडण्यासाठी मी कटिबद्ध आहे धनगर समाजानेही मोठ्या प्रमाणात बीड जिल्ह्यातील मतदान मला केलेले आहे सामाजिक जीवनामध्ये काम करत असताना सर्वसामान्य माणसाचे शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवत असताना धनगर समाजाचाही प्रश्न मी निश्चितपणे सोडवण्यासाठी कार्य तत्पर आहे धनगर समाज हा बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात असून आगामी निवडणुकांमध्ये धनगर समाजाने मताचा टक्का वाढवला पाहिजे यासाठी निश्चितपणे प्रयत्न करणे काळाची गरज आहे गेल्या अनेक वर्षापासून धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा प्रश्न रेंगाळत राहिलेला आहे या प्रश्नासाठी अनेक सरकार आले आणि गेले परंतु या वाड्यावर वस्त्यावर व दर्याखोऱ्यामध्ये मेंढपाळ करून स्वतःचे जीवन जगणाऱ्या धनगर समाजाला अनेक वर्षापासून फसवले जात आहे भारतीय जनता पार्टीच्या सरकारने दहा वर्षांपूर्वी शब्द दिला होता की पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा प्रश्न सोडवणार परंतु त्यांनी मात्र दहा वर्षांमध्ये धनगर समाजाला वाऱ्यावर सोडण्याचे काम केलेला आहे त्यामुळे आगामी काळात जे काही धनगर समाजाचे छोटे छोटे





मोठे प्रश्न असतील ते सोडवण्यासाठी मी कार्यतत्पर आहे आणि निश्चितपणे सोडवण्यासाठी मी ताकतीने प्रयत्न करणार आहे धनगर समाज हा अतिशय कष्टाळू समाज असून इमानदार आणि प्रमाणिक समाज आहे हा समाज विखुरला गेलेला आहे त्यामुळे या समाजाला म्हणावं त्या प्रमाणात राजकीय प्रतिनिधित्व मिळत नाही आणि आगामी काळात आमच्या माध्यमातून राजकीय प्रतिनिधित्व पवार साहेबांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यामध्ये निश्चितपणाने मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू आणि धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाच्या प्रश्नासाठी मी कार्य तत्पर आहे असे देखील सत्काराला उत्तर देताना बीड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी व्यक्त केले यावेळी धनगर समाज संघर्ष समिती बीड जिल्हाप्रमुख दत्ता वाकसे, आष्टी पाटोदा येथील धनगर समाजाचे नेते सुनील काळे, सचिन रोडे, कांता मात्रे, नरेश कोठुळे, अशोक निगोळे, यासह धनगर समाजाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते

दत्ता वाकसे यांनी निवडणुकीत दिलेली साथ कधीच विसरणार नाही आगामी काळात न्याय देणार-खा बजरंग सोनवणे

संपूर्ण धनगर समाज एका बाजूने असताना धनगर समाज संघर्ष समितीची बीड जिल्हाप्रमुख दत्ता वाकसे यांनी मोठ्या प्रमाणात निवडणुकीमध्ये धनगर समाजाच्या गावागावांमध्ये बैठका घेऊन मला ताकद दिली साथ दिली ती कधीच आम्ही आणि पक्ष विसरणार नाही आगामी काळात निश्चित त्यांना न्याय देऊ राजकीय क्षेत्रामध्ये त्यांचं कामही चांगला आहे आणि त्यांनी संघर्ष हे धनगर समाजाच्या आरक्षणाचा विविध मागण्यासाठी केलेला आहे त्यामुळे आगामी काळात निश्चित दत्ता वाकसे यांना मी न्याय देऊ असे देखील बीड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी म्हटले आहे



**बीडचे नवनिर्वाचित खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांना शुभेच्छा देताना स्वप्निल भैया गलधर , मोहम्मद अझरुद्दीन ए एस गोलू , सालेम चाऊस , शेख सलमान मुज्जू भाई, अबरार खान पटेल ,**

# द्रौपदाबाई खरटमोल यांचे निधन



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील द्रौपदाबाई नरसिंगराव खरटमोल (वय ९३ वर्ष) यांचे वृध्दापकाळाने शुक्रवार दि.१४ जुन रोजी निधन झाले.द्रौपदाबाई खरटमोल ह्या स्वभावाने मनमिळावू तसेच दुसर्याच्या सुख दुःखात सहभागी होणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्या अत्यंत धार्मिक वृत्तीच्या होत्या, धार्मिक- सामाजिक,सांस्कृतिक सोहळ्यात त्या अग्रेसर असत. आपल्या संस्कारातून मुलांना योग्य मार्गदर्शन करून उत्तम पद्धतीने मुलाची जडण-घडण व्हावी या उद्देशाने त्यांनी कार्य केले. त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या पार्थिवावर शनिवार,दि.१५ जुन रोजी सकाळी नऊ वाजता दासोपंत समाधी परिसर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पाच मुले,तीन मुली,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील पत्रकार गोविंद खरटमोल यांच्या त्या मातोश्री आहेत.



बीड:-माजी नगराध्यक्ष शेख मुजीब यांचे बंधू शेख जावेद इनामदार यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या गटात जाहीर प्रवेश केला यावेळी त्यांच्या समवेत नगरसेवक मुखीद लाला , वाजेद कुरेशी,सय्यद खाजा ,सलीम खान, शेख सुलतान, आवेज ईनामदार.




# एकनाथजी शिंदें यांच्या शिष्टमंडळातील दोन शिलेदारांच्या शिष्टाईला यश– बाजीराव चव्हाण

दि.१३ रोजी अंतरवली सराटी येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने मराठा आरक्षण उपोषण कर्ते मा.मनोज दादा जरांगे पाटील यांना भेटून उपोषण स्थगित करावे यासाठी शिष्टमंडळानी भेट दिली.महाराष्ट्र शासनाच्या वतीने शिष्टमंडळात मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे खास जवळचे असलेले दोन शिलेदार राज्य उत्पादन शुल्क मंत्री मा.शंभुराज देसाई साहेब,रोजगार हमी योजना मंत्री व नवनिर्वाचित खासदार मा.संदिपान भुमरे,आ.राणाजगजित सिंह पाटील,बाजीराव चव्हाण,यांचा समावेश होता.यावेळी मनोज दादा जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षण,कुणबी प्रमाणपत्र वाटपा मधील अडथळे,मराठा आरक्षण लढ्यातील गुन्हे माघारी घेण्यात यावेत.याप्रमुख मागण्यांसह ईतर काही मागण्या शिष्टमंडळासमोर मांडल्या असता.शंभुराज देसाई साहेब यांनी आपल्या मागण्या पुर्ण करण्यासाठी एक महीन्याची वेळ द्यावा.आपल्या मागण्या विषयी एक महीन्यात तोडगा काढु असा शब्द दिला असता मनोज दादा जरांगे पाटील यांनी मंत्री शंभुराज देसाई साहेब, खासदार संदीपान भुमरे, आ.राणाजगजितसिंह पाटील बाजीराव चव्हाण यांच्या शिष्टमंडळाच्या शब्दाला मान देऊन मनोज दादा जरांगे पाटील यांनी एक महीन्यासाठी उपोषण स्थगित करीत असल्याचे जाहीर करत आमचा तुमच्यावर पुर्ण विश्वास असुन आमच्या मागण्या तुम्हीच पुर्ण करु शकता असा विश्वास देखील व्यक्त केला.

# पंडितभाऊ दाभाडे यांची राज्यस्तरीय आदर्श सेवारत्न पुरस्कारासाठी निवड

पुणे । प्रतिनिधी

पुणे येथील पी .एन .डी .इंटरप्राईजेस व माशाचे होलसेल व्यापारी आणि साप्ताहिक उमेदवाराचे संपादक व पत्रकार तर बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे यांची राज्यस्तरीय आदर्श सेवारत्न पुरस्कार २०२४ करिता सोलापूर जिल्ह्यातील लोकप्रिय दैनिक असलेले दैनिक तुफान क्रांती या वृत्तपत्राच्या वतीने बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे यांच्या सामाजिक शैक्षणिक राजकीय व धार्मिक व पत्रकारिता क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन या राज्यस्तरीय आदर्श सेवारत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे राज्यस्तरीय आदर्श सेवारत्न पुरस्काराचे पत्र बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे यांना प्राप्त झाले आहे.

रविवार दिनांक १६ जून २०२४ रोजी रोजी दुपारी एक वाजता सोलापूर जिल्ह्यातील सांगोला पंचायत समिती सांगोला येथे भव्य दिव्य कार्यक्रमात पंडितभाऊ दाभाडे यांना हा पुरस्कार विविध मान्यवरांच्या उपस्थितीत व शुभ हस्ते देण्यात येणार आहे. पंडितभाऊ दाभाडे बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष यांना या अगोदर सुद्धा त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची दखल घेऊन अनेक पुरस्कार मिळाले असून त्यामध्ये राज्यस्तरीय टीएमजी अनमोल कार्य गौरव पुरस्कार आणि लेक लाडकी अभियान महाराष्ट्र अंतर्गत भारत गौरव राष्ट्र प्रेरणा पुरस्कार देऊन तर अनेक पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे




सामाजिक कार्यकर्ते आणि बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे हे गेल्या अनेक वर्षापासून राज्यात सामाजिक राजकीय शैक्षणिक धार्मिक पत्रकारिता अंधश्रद्धा निर्मूलन आरोग्य वृक्षरोपण रेशनिंग गरजू लोकांना आर्थिक मदत करणे व सर्वसामान्य गोरगरिबांना न्याय मिळावा म्हणून अनेक राज्यात अनेक आंदोलने केली त्यामध्ये मोर्चा धरणे उपोषण जनजागृती चे कार्यक्रम सातत्याने राबवित असताना सक्रिय दिसतात रक्तदान शिबिर रक्तगट तपासणी आरोग्य शिबीर तसेच विविध कार्यशाळाचे आयोजन करीत असतात आणि विविध थोर महापुरुषांच्या जयंती आणि पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करून संतांचे व महापुरुषांचे विचार लोकां पर्यंत पोहोचण्याचे काम करीत असतात आणि त्यांच्या कार्याविषयी माहिती देत असतात १५ ऑगस्ट २६ जानेवारी सामाजिक न्याय दिन २६ नोव्हेंबर १ मे कामगार दिन व महाराष्ट्र दिन यांच्यासह अनेक उत्सव सातत्याने साजरे करीत असतात आजही ते विविध क्षेत्रांमध्ये स्वयं स्वयंप्रेरणेने तळमळीने सातत्याने गेल्या किती वर्षापासून कार्य करीत आहेत.

विविध सामाजिक राजकीय संघटनेमध्ये सुद्धा ते सक्रिय व कार्यरत आहेत त्यामध्ये बहुजन जनता दल राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांचे कार्य मोठ्या प्रमाणात राज्यात सक्रिय असून त्या माध्यमातून गोरगरीब अपंग अंध गरजूवंतांना दिन दलितांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असतात अशा विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा राज्यात ठसा उमटवलेले बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे यांच्या कार्याची दखल घेऊन सोलापूर जिल्ह्यातील लोकप्रिय असलेले दैनिक तुफान क्रांती या वृत्तपत्राच्या वतीने २०२४ या वर्षाचा मानाचा समजला जाणारा राज्यस्तरीय आदर्श सेवारत्न पुरस्कारासाठी बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे यांची निवड करण्यात आली असून पंडितभाऊ दाभाडे बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष यांना हा पुरस्कार देऊन विविध मान्यवरांच्या उपस्थितीत शुभ हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे त्यांची या पुस्तकासाठी निवड झाल्याबद्दल राज्यातील विविध सामाजिक संस्था संघटना तसेच विविध राजकीय पक्षांचे नेते आणि पदाधिकाऱ्याकडून सामाजिक कार्यकर्ते पत्रकारआणि संपादक यांच्याकडून पंडितभाऊ दाभाडे राष्ट्रीय अध्यक्ष बहुजन जनता दल यांचे अभिनंदन करण्यात येत असून त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहे त्यांच्या पुरस्कार निवडीबद्दल राज्यातील बहुजन जनता दलाच्या कार्यकर्त्यांमध्ये व पदाधिकाऱ्यांमध्ये व सर्वत्र उत्सवाचेआनंदाचे वातावरण सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात निर्माण झाले आहे व सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे अशी माहिती समाजसेवक गजानन हरणे यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे

# गेवराई शहरातील टीएमसी परिसरात आढळला आचाऱ्याचा मृतदेह

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : हॉटेलवर जेवण तयार करत असलेल्या एका आचाराचा मृतदेह गुरुवार (दि. १३) शहराच्या काही अंतरावरील गेवराई-जातेगाव रस्त्यावरील टीएमसी परिसरात आढळून आला.गणेश नाथा आबदगिरे (वय ४५) रा.मुंगी ता पैठण असे मृताचे नाव असून, ते मागील काही वर्षांपासून गेवराई शहरातील यशराज नगर येथे राहत आहेत.

शहरातील एका हॉटेलवर (आचारी) जेवण तयार करण्याचे काम करत होते. बुधवारी (ता १२) रात्री हॉटेल काम आटोपून घराकडे गेले मात्र घरी न पोहचलेल्या गणेश आबदगिरे यांचा मृतदेह गुरुवार (ता १३) टीएमसी परिसरात आढळून आला. दरम्यान, सदरील मृताची दुचाकी एका स्मशानभूमी नजीक तर येथून काही अंतरावर गणेश आबदगिरे यांचा मृतदेह आढळून आल्याने सदरील मृत्यू संशयास्पद असल्याचे कुटुंबीयाचे म्हणणे आहे.



याबाबत गेवराई पोलीस ठाण्यात माहीती मिळताच फौजदार शिवाजी भूतेकर हे पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळावर धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी गेवराई उपजिल्हा रूग्णालयात दाखल केला.घात की अपघात तपास केल्यानंतर खरा प्रकार उघडकीस येईल असे फौजदार शिवाजी भूतेकर यांनी सांगीतले असून सहायक फौजदार सुतार हे या घटनेचा तपास करत आहेत.

# कंत्राटी कामगारांचे महावितरण कार्यालयासमोर धरणे आंदोलन

## वर्कस फेडरेशनच्या वतीने जोरदार जोरदार घोषणाबाजी

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील माजलगाव उपविभाग, धारूर उपविभाग व केज उपविभाग येथील महावितरण मध्ये काम करणारे बाह्यस्त्रोत यंत्रचालक व व तंत्रज्ञ या कामगारांचे गेल्या दोन महिन्यापासून पगार न झाल्यामुळे कामगारांनी काम बंद आंदोलनाचा पवित्रा घेतला. या आंदोलनात महाराष्ट्र स्टेट एलेक्ट्रीसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेने च्या वतीने बाह्यस्त्रोत कामगारांचे धरणे आंदोलन दि.१३.०६.२०२४ रोजी बीड येथील महावितरण कार्यालयासमोर धरण आंदोलन व निदर्शने केली.

या तिन्ही उपविभागात काम करणाऱ्या जवळपास ८५ कामगारांचा माहे एप्रिल व मे चा पगार संबधित कंत्राटदारा मार्फत करण्यात आला नाही त्यामुळे बाह्यस्त्रोत कामगारांना असंख्य अडचणीणा सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे दि.१०.०६.२०२४ रोजी मा.अधीक्षक अभियंता यांना संघटनेमार्फत व वयक्तिक सर्व कामगारांचे पत्र देण्यात आले होते तरीही पगार न झाल्यामुळे आज संघटनेच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनामध्ये सर्व कामगार व महाराष्ट्र स्टेट एलेक्ट्रीसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेचे अंबाजोगाई विभागीय अध्यक्ष कॉम्रेड शेख अखिल यांच्यासह सर्व कामगार उपस्थित होते.

# मराठवाड्यावर जलसंकट!

**हिंगोली : मागील महिन्यात उन्हाच्या कडाक्यात अनेक गावांना पाणीटंचाईच्या समस्यांना सामोरे जावे लागत होते. महिलांना ऐन उन्हाळ्यात पाण्यासाठी वणवण करावी लागत होती. मात्र आता जून महिन्याला सुरुवात झाली असून मान्सूनचेही आगमन झाले आहे. पावसामुळे नागरिकांना उन्हाच्या काहीली पासून काहीसा दिलासा मिळाला आहे. परंतु अजूनही अनेक गावांना पाणीबाणीच्या समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे दिसून येत आहे.**

मराठवाड्यात आजही टँकरने पाणीपुरवठा

दुष्काळी मराठवाड्यात यावर्षी मान्सून एक दिवस आधीच दाखल झाला. छत्रपती संभाजीनगरसह सर्वच मराठवाड्यात हा पाऊस धो-धो बरसला. पहिल्याच पावसात नद्या-नाले ओसंडून वाहू लागले. तर काही ठिकाणी नद्यांना पूर देखील आला. त्यामुळे पहिल्याच पावसात मराठवाड्यात पाऊसपाणी झाले. एकीकडे असे चित्र असताना आजही मराठवाड्यातील टँकरची संख्या कमी झालेली नाही. त्यामुळे ही टँकर लॉबी तर नाही ना, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, गेल्या काही वर्षात मराठवाडा दुष्काळ आणि टँकर हे एक जणू समीकरण बनले आहे. यातूनच टँकर लॉबी सारखा प्रकार समोर आल्याचे अनेकदा पाहायला मिळाले. त्यामुळे धो धो पाऊस पडूनही मराठवाड्यातील दुष्काळ कधी मिटणार हे पाहणे महत्वाचे असणार आहे.



### 'या' शहरात पाणीटँकरने पाणीपुरवठा

छत्रपती संभाजीनगर येथे ५५५ गाव वाड्यांवर ७४१ टँकर सुरू आहेत. जालना ४७५ गाव वाड्यांवर ५४२ टँकर सुरू आहेत.
बीड ७३९ गाव वाड्यांवर ४६८ टँकर सुरू आहेत. परभणी ३२ गाव वाड्यांवर ३३ टँकर सुरू आहेत. हिंगोली १० गाव वाड्यांवर १० टँकर सुरू आहेत.
नांदेड ४० गाव वाड्यांवर ३९ टँकर सुरू आहेत. धाराशिव १०२ गाव वाड्यांवर १५० टँकर सुरू आहेत. लातूर ४७ गाव वाड्यांवर ४१ टँकर सुरू आहेत.



**बीड :- येथील विद्यार्थिनी नबीला आमेर सलीम व रिदा उमैर सलीम ही निट परीक्षेत उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा आज न.प.चे माजी उपाध्यक्ष शेख शाकेर, माजी उपाध्यक्ष नसीम इनामदार, माजी सभापती जलील खान, माजी सभापती शकील खान बिल्डर, नगरसेवक जैतुल्लाह खान, प्रहार संघटनेचे शेख रहीम, समाजसेवक बाबा खान यांच्यावतीने सत्कार करण्यात आला यावेळी आमिर सलीम सर, उमैर सलीम सर सह आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# लवुळ ग्रामपंचायत च्या हलगर्जी पणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**माजलगाव । प्रतिनिधी**

**लवुळ गावात नाल्यामध्ये पानी साचल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत वारंवार नागरिकांने ग्रामपंचायत ला सांगून देखील याकडे ग्रामपंचायत दुर्लक्ष करत आहे** यामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यामध्ये येण्याची शक्यता आहे सध्या पावसाचे दिवस असल्यामुळे या अश्या अवस्था मुळे गावामध्ये साथीचे रोग पसरण्याची शक्यता आहे म्हणून ग्रामपंचायतने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन गावातील नाल्या साफ कराव्यात अशी मागणी लावुळ १ गावातील नागरिकांतून होत आहे.

# बोबडेवाडीत दोन गटात मारहाण दोन लाखाचा ऐवज पळविला २७ जणां विरूद्ध गुन्हा दाखल

केज ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील बोबडेवाडी येथे परवा रात्री ९-०० वाजण्याच्या दरम्यान तु मतदान झाल्या पासुन लई माजलासअशी भांडणाची कुरापत काढुन दोन गटात हाणामारी होऊन एकाच्या खिशा तील रोख ५० हजार रूपये व १ लाख ५०हजार रूपये किमतीचे गळ्यातील ५ ग्रामसोन्याचे लॉकेट मीळून एकुण २ लाख रुपयाचा ऐवज लंपास केल्याप्रकरणी २७ आरोपींविरुद्ध केज पोलीसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. परवा रात्री ९-०० वाजण्याच्या दरम्यान निरंजन अशोक बोबडे यांच्या राहत्या घरात घुसुन व गैरकायद्याची मंडळी जमवून तू मतदान झाल्या पासून लई माजलासअशी भांडणाची कुरापत काढून शिवीगाळ करून लाथा बुक्याने मारहाण केली. वैजनाथ नारायण बोबडे याने निरंजन अशोकबोबडे च्या खिशातील ५० हजार रूपये काढून घेतले व बाबासाहेब रघुनाथ बोबडे व विष्णु बाबासाहेब बोबडे या बापलेकांनी त्यांच्या गळ्यातील पाच तोळ्याचे लॉकेट काढून घेतले.असा एकुण २ लाख रूपयाचा ऐवज आरोपीतांनी चोरून नेला.आण्णासाहेब वैजनाथ बोबडे हे मध्यस्ती करुन सोडविण्यासाठी आले असता त्यांच्या उजव्या डोळ्यावर चाकू सारख्या हत्याराचा मार लागुन ते जखमी झाले आहेत.व २० ते २५ लोकांनी हातात काठ्या, गज,कोयते घेवुन घरी येऊन शिवागाळ करून निरंजन अशोक बोबडे व त्यांच्या कुटूंबीयांना जिवे मारण्याची धमकी दिली. म्हणून निरंजन अशोक बोबडे वय ३५ वर्षे,रा. बोबडेवाडी यांचे फिर्यादी वरून बाबासाहेब रघुनाथ बोबडे,नारायण रघुनाथ बोबडे,विष्णु बाबासाहेब बोबडे,सिध्देश्वर बाबासाहेब बोबडे, वैजनाथ नारायण बोबडे, महेश जगन्नाथ बोबडे, देविदास नारायण बोबडे, भैरवनाथ विठ्ठल बोबडे, रोहीत अर्जुन बोबडे, गोविंद अर्जुन बोबडे, विठ्ठल गोपीनाथ बोबडे, अर्जुन गोपीनाथ बोबडे व इतर १० ते १५रा.सर्वजण बोबडेवाडी अशा २७जणां विरुद्ध केज पोलीसात सोमवारी पहाटे गुन्हा नोंद झाला आहे.पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शना खाली.

# हरल्या तरीही सुनेत्रा पवार राज्यसभेतून खासदार

मुंबई - प्रथमच लोकसभा लढवणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा बारामतीतून नणंद सुप्रिया सुळेंकडून पराभूत झाल्या. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर झालेल्या निवडणुकीतील या नामुष्कीने अजितदादांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उभे झाले. मात्र ९ दिवसांत दादांनी कसर भरून काढली. प्रफुल्ल पटेलांच्या राजीनाम्याने रिक्त राज्यसभेच्या पोटनिवडणुकीत दादांनी सुनेत्रा यांना खासदार करून दाखवले. आमदारांच्या मतदानाद्वारे ही निवडणूक होणार होती. युतीकडे २८८ पैकी २०० आमदार असल्याने विरोधकांनी अर्जच भरला नाही व सुनेत्रा बिनविरोध विजयी झाल्या. त्यांचा कार्यकाळ उर्वरित ४ वर्षे असेल.



केंद्रीय मंत्रिमंडळात मोदींनी शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी (अजित गट) यांच्यासाठी दोन स्वतंत्र प्रभार असलेले राज्यमंत्रिपद ठेवले होते. शिंदेसेनेने या पदावर प्रताप जाधव यांची वर्णी लावली, मात्र अजितदादा गटाने ते नाकारले. कारण राष्ट्रवादीतून मंत्रिपदासाठी प्रफुल्ल पटेल यांचे नाव पुढे केले होते.

# आदित्य ठाकरे यांच्या वाढिवसानिमित्त परळी शिवसेनेच्या वतीने प्रभु वैद्यनाथास आभिषेक पुजन

**परळी / प्रतिनिधी**

**शिवसेना नेते युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने श्री प्रभु वैद्यनाथ पंचम ज्योतिर्लिंग भगवान ला आभिषेक पूजन करून निरोगी दीर्घ आयुष्य लाभो अशी प्रार्थना करण्यात आली.**



परळी शहरातील वैजनाथ पंचम ज्योतिर्लिंग बारा ज्योतिर्लिंगापैकी एकमेव पंचम वैद्यनाथ ज्योतिर्लिंग आहे या ज्योतिर्लिंगाला स्पर्श करून दर्शन घेतल्यास शरीरात ऐक वेगळ्या प्रकारची ऊर्जा निर्माण होते सर्व रोगाचा नाश होऊन माणूस निरोगी राहतो. ज्यावेळी समुद्रमंथन झाले त्यावेळी अनेक प्रकारचे औषधी व खजाना समुद्र मार्गाने प्रगट झाला त्यावेळी धन्वंतरी व अमृत कृती हे सुद्धा दोन रत्न समुद्र समुद्रातून निघाले त्यावेळेस राक्षस लोक हे घेण्यासाठी धावपळ करू लागले त्यावेळेस श्री विष्णू भगवंताने हे दोन रत्न प्रभू वैजनाथच्या पिंडीत लुप्त केले अशी आकायिका आहे . वैजनाथ प्रभू चे अभिषेक

करून आदित्य ठाकरे साहेबांना दीर्घ निरोगी आयुष्य मिळावे यासाठी अभिषेक करण्यात आले. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख भोजीराज पालीवाल शिवसेना शहर प्रमुख राजेश विभुते तालुका विधानसभा संघटक सतीश जगताप शिवसेना उप तालुका प्रमुख महेश केंद्रे युवा सेनेचे शहर पदाधिकारी उमेश चौधरी युवा सेनेचे शहर संघटक राहुल उपाडे भोपळ्याची शाखाप्रमुख सुरेश चव्हाण शिवसेनेचे शाखाप्रमुख विजय जाधव हरीश पालीवाल बालाजी नागरगोजे शिवाजी दराडे विशाल सुगरे इत्यादी शिवसैनिक व पदाधिकारी व भक्तगण अभिषेक पूजन ला उपस्थित होते.

# मनोज जरांगेच उपोषण स्थगित, सरकारसोबत काय ठरलं?

राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने मनोज जरांगे यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सगेसोयरेच्या बाबत निर्णय घेण्यासाठी योग्य ते पाऊल सरकारकडून उचललं जाईल, असं आश्वासन दिलं. या शिष्टमंडळाची मनोज जरांगे यांच्यासोबत बराच वेळ चर्चा झाली. अखेर मनोज जरांगे यांची समजूत काढण्यात सरकारच्या शिष्टमंडळाला यश आलं.

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज आपलं उपोषण स्थगित केलं आहे. मनोज जरांगे गेल्या पाच दिवसांपासून जालन्यात अंतरवली सराटी येथे उपोषणाला बसले आहेत. मराठा आरक्षणाच्या मसुद्यात सगेसोयरे बाबतची मागणी मान्य करा आणि तशी अंमलबजावणी करा, अशी मनोज जरांगे पाटील यांची मागणी आहे. याच मागणीसाठी ते उपोषणाला बसले आहेत. मनोज जरांगे यांनी काल राज्य सरकारवर टीका केली होती. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ओएसडीवरही गंभीर आरोप केले होते. यानंतर आज महाराष्ट्र सरकारचं शिष्टमंडळ मनोज जरांगे यांच्या भेटीसाठी दाखल झालं. राज्याचे उत्पादन शुल्क विभागाचे मंत्री शंभूराज देसाई हे स्वत: या शिष्टमंडळात होते. तसेच भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील, छत्रपती संभाजीनगरचे नवनिर्वाचित खासदार संदीपान भुमरे यांचादेखील या शिष्टमंडळात समावेश होता.

राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने मनोज जरांगे यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सगेसोयरेच्या बाबत निर्णय घेण्यासाठी योग्य ते पाऊल सरकारकडून उचललं जाईल, असं आश्वासन दिलं. यावेळी मनोज जरांगे यांनी सरकारला सगेसोयऱ्याच्या अंमलबजावणीसाठी एक महिन्याचा अल्टीमेटम दिला. तर सरकारच्या शिष्टमंडळाने आम्ही तातडीने



याबाबतच्या बैठका घेऊ आणि निर्णय घेऊ, असं आश्वासन दिलं. या आश्वासनानंतर मनोज जरांगे यांनी उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा केली.

नेमकी चर्चा काय झाली?

मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी राज्य सरकारचं शिष्टमंडळ आलं तेव्हा दोन्ही बाजूने चर्चा करण्यात आली. मनोज जरांगे सगेसोयऱ्याच्या मुद्द्यावर कायम राहिले. यावेळी शंभूराज देसाई यांनी मनोज जरांगे यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली. आपल्या सर्व मागण्या मान्य होतील. फक्त तुम्ही उपोषण मागे घ्या. तुमच्या प्रकृतीची आम्हाला काळजी आहे, असं शंभूराज देसाई म्हणाले. शंभूराज देसाई यांनी आपण उद्या याबाबतची तातडीचे बैठक घेऊ, असं आश्वासन मनोज जरांगे यांना दिलं.

यावेळी मनोज जरांगे यांनी सरकारला ३० जूनपर्यंत सगेसोयरेबाबतचा अध्यादेश काढा, अशी मागणी केली. त्यावर शंभूराज देसाई यांनी एक महिन्यांची मुदत वाढवून द्यावी, अशी विनंती केली. पण मनोज जरांगे सुरुवातीला एक महिन्यांची मुदत वाढवून देण्यास तयार नव्हते. सरकारच्या शिष्टमंडळाने विनंती केल्यानंतर ते तयार झाले. त्यांनी सरकारला १३ जुलैपर्यंतची मुदत दिली आहे. तोपर्यंत सरकारने सगेसोयरेबाबत निर्णय घेतला नाही तर आपण आगामी विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरु, असा इशाराच मनोज जरांगे यांनी यावेळी सरकारला दिला.


# कृषि मंत्र्यांचा म्हत्वाचा निर्णय

## बारावी सायन्स उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना घेता येणार बी.टेक फूडला प्रवेश
## बी.टेक फूड टेक्नॉलॉजी प्रवेशासाठी गणित विषयाची अट रद्द

बीड / प्रतिनिधी

राज्याचे कृषी मंत्री मा. ना. धनंजयजी मुंडे साहेब यांचे मान्यतेने महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे आणि राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांतर्गत सुरू असणाऱ्या अन्नतंत्रज्ञान (फूड टेक्नॉलॉजी) पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी बारावी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांना गणित (चरींहशारींळली) या विषयाची अट रद्द करण्यात आली असून, यासाठी मा. महासंचालक, आणि मा. संचालक महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व असोसिएशन ऑफ द मॅनेजमेंट्स ऑफ अग्रिकल्चर अँड एग्रीकल्चर अलाईट कॉलेजेस, नाशिक यांनी महाराष्ट्र शासनास विनंती करून यावर्षी बी.टेक. (फूड टेक्नॉलॉजी) या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी गणित (चरींहशारींळली) हा विषय कंपल्सरी (अनिवार्य) न ठेवता पीसीबी तसेच पीसीबीएम किंवा पीसीएम अशा सर्व विषयापैकी कोणत्याही ग्रुपच्या विद्यार्थ्यांस प्रवेशाची संधी देण्याबाबत पाठपुरावा केला होता.या निर्णयामुळे महाराष्ट्रातील सर्व संस्था चालकांनी मा. कृषि मंत्री ना.धनंजयजी मुंडे साहेब यांचे विशेष आभार मानले आहेत. करिता बी.टेक. (फूड टेक्नॉलॉजी) या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पीसीबी तसेच पीसीबीएम किंवा पीसीएम हे ग्रुप असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी बीडमध्ये असणाऱ्या सौ.के.एस.के. (काकू) कॉलेज ऑफ फूड टेक्नॉलॉजी, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे त्वरित संपर्क करावा. या अभ्यासक्रमाची पदवी घेतलेल्या आतापर्यंत या महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या वर्ष २००४ पासूनच्या सर्व बॅचेसच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे १००% (शंभर टक्के) प्लेसमेंट झाले असल्याने आणि या महाविद्यालयास कृषि विद्यापीठाचा 'अ' दर्जा असल्याने बहूसंख्य विद्यार्थी राज्यातील सर्व भागातून याठिकाणी प्रवेशास येतात. तरी सर्व पालक आणि विद्यार्थ्यांनी या बी.टेक फूड टेक्नॉलॉजी या उच्च तंत्रज्ञान शिक्षणाच्या पदवी अभ्यासक्रमास प्रवेशासाठी सौ.के.एस. के. (काकू) कॉलेज ऑफ फूड टेक्नॉलॉजी, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे त्वरित संपर्क करावा.

# वीज चमकत असताना मोबाईल फोनचा वापर का करु नये? जाणून घ्या



मुंबई : मान्सूनची चाहूल लागली असून ठिकठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. मान्सूनच्या सुरुवातीला वीज पडून नुकसानीच्या घटना पाहायला मिळत आहे. काही ठिकाणी वीज पडून काही जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. दरम्यान, वीज चमकत असताना मोबाईल फोनचा वापर करु नये, असं सांगितलं जातं. पण यामागचं नेमकं कारण काय आहे, हे तुम्हाला माहित आहे का? नसेल तर ही बातमी जरूर वाचा.

पावसाळ्यात जेव्हा विजा कडकतात, तेव्हा अनेक लोक विद्युत उपकरणे बंद करतात. याशिवाय पावसाळ्यात विजा चमकताना खुल्या आकाशाखाली मोबाईल फोन वापरण्यास मनाई केली जाते, पण यामागचं नेमकं कारण काय? हे फार कमी लोकांना माहिती आहे. वीज चमकताना मोबाईल फोन न वापरण्यामागचं कारण काय? मोबाईल फोन आणि विजेचा नेमका संबंध काय? असा प्रश्न तुम्हाला कधी पडला आहे का? तर त्याचं उत्तर जाणून घ्या.

तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, जेव्हा आपण मोबाईल फोन वापरतो, तेव्हा तो अतिनील किरणे वेगाने उत्सर्जित करतो. अतिनील किरण विजेला स्वतःकडे वेगाने आकर्षित करतात. एका वैद्यकीय जर्नलमध्ये यासंबंधित माहिती प्रकाशित करण्यात आली आहे.


वीज चमकताना मोबाईल फोन बंद ठेवावा

वीज पडून अनेकांचा मृत्यू झाल्याचा घटना तुम्ही ऐकल्या वाचल्या असतील. बहुतेक वेळा हे लोक पावसात मोबाईल फोन वापरत असताना त्यांच्यावर वीज कोसळल्याचं समोर आलं आहे. यामुळेच जेव्हा वीज चमकते, तेव्हा मोबाईल फोन बंद ठेवावा, असं सांगितलं जातं. याशिवाय मोकळ्या आकाशात मोबाईल फोन वापरण्यास मनाई केली जाते.

वीज चमकताना इलेक्ट्रॉनिक उपकरणेही बंद करावीत

विजा चमकताना घरातही टीव्ही, फ्रीज, कुलर, स्मार्ट टीव्ही अशी सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरणं टाळावे आणि ती बंद ठेवावीत. याशिवाय लॅपटॉप विजेलाही आकर्षित करतो, त्यामुळे पावसाळ्यात टिन शेडखाली बसून मोबाईल किंवा लॅपटॉपचा वापर टाळावा. तसेच या पावसाळ्यात विद्युत खांब देखील कंडक्टर म्हणून काम करतात, त्यामुळे त्यांच्यापासून दूर राहण्याचा सल्ला दिला जातो. पावसाळ्यात, कोणत्याही वायरला जोडलेल्या आणि त्याद्वारे चालवल्या जाणाऱ्या सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणांपासून दूर राहण्यास सांगितलं जातं.

# लोकसभा सभापतीपदासाठी २६ जूनला होणार निवडणूक



## २४ जूनला सुरू होणार संसदेचे अधिवेशन

सूत्रांच्या माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी परदेशी दौऱ्यावर परतल्यानंतर लोकसभेच्या नवया सभापतींच्या नावावर विचार-विनिमय करतील. भाजप आधी पक्ष स्तरावर लोकसभेच्या भावी सभापतींचे नाव ठरवतील त्यानंतर सहकारी पक्षासोबत विचार-विनिमय केला जाईल.

## कोणाकडे राहणार लोकसभा सभापती पद?

लोकसभा सभापती पद भारतीय जनता पक्ष आपल्याकडेच ठेवत आहे. म्हणजेच१८व्या लोकसभेत भाजपचेच कोणीतरी खासदार लोकसभा सभापती म्हणून निवडले जाणार आहेत.

नवी दिल्ली: लोकसभा निवडणूक २०२४ संपल्यानंतर नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान बनले. रविवारी शपथ घेतल्यानंतर सोमवारी सर्व मंत्र्यांना मंत्रिमंडळाचे वाटप करण्यात आले आणि सरकारने आपले काम सुरू केले आहे. आता सर्व लोकांच्या नजरा लोकसभा सभापतीच्या निवडणुकीवर होत्या. याबाबत राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी नोटिफिकेशन जारी केले आहे. ही निवडणूक २६ जूनला होणार आहे.

२७ तारखेला संसदेच्या दोन्ही सदनांना राष्ट्रपती संबोधित करतील. या दिवशी सकाळी ११ वाजता राष्ट्रपतींचे अभिभाषण होईल.

# भाग बदलत पाऊस पडणार, पेरणी करताना शेतकऱ्यांनी पंजाबराव डख यांचा पावसाबाबतचा अंदाज काय?

मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला आहे. काही ठिकाणी दमदार पाऊस होतोय. तर काही ठिकाणी रिमझिम पावसाच्या सरी कोसळत आहेत. अशात बळीराजा खरीप पिकांच्या पेरणीच्या तयारीला लागलाय. पेरणी कधी करावी? याचा अंदाज शेतकरी घेत आहेत. पण पेरणी नेमकी कधी करावी? याची शेतकरी चाचपणी करत आहेत. अशातच हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी पावसाबाबतचा अंदाज व्यक्त केला आहे. पाऊस कधी आणि किती प्रमाणात पडणार? यावर पंजाबराव डख यांनी अंदाज व्यक्त केलाय. शेतकऱ्यांनी पेरणी कधी करावी, यावरही पंजाबराव डख यांनी भाष्य केलं आहे.

पंजाबराव डख यांचा अंदाज काय?

राज्यात १४ जूनपर्यंत दररोज भाग बदलत पाऊस पडणार आहे. परंतु या कालावधीत राज्यातील दक्षिणेकडील भागांमध्ये चांगला पाऊस पडणार अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहमदनगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर, धाराशिव, पंढरपूर या भागात मुसळधार पावसाची शक्यता आहे. उर्वरित महाराष्ट्रात मात्र खूप मोठ्या प्रमाणात पाऊस पडणार नाही. तसेच १५ ते १६ जून दरम्यान पावसाची विश्रांती पाहायला मिळू शकते, असा अंदाज पंजाबराव डख यांनी व्यक्त केला आहे.

शेतकऱ्यांना सल्ला काय?

१६ जून नंतर पुन्हा एकदा पाऊस सक्रिय होणार आहे. साधारणता १८ जून नंतर जोरदार पाऊस सुरु होईल. आता महाराष्ट्रात पावसाला सुरुवात झाली आहे. मात्र शेतकऱ्यांनी थोडी प्रतिक्षा करूनच पेरणी करावी. जमीन किमान सहा इंच ओल गेल्यानंतरच पेरणी करण्याचा निर्णय घ्यावा, असा सल्ला पंजाबराव डख यांनी शेतकऱ्यांना दिला.शेतकरी काही वेळी पेरणी लवकर करतात. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचं संकट येतं. यावरही डख बोलले आहेत. पेरणीचा निर्णय घाई घाईने घेऊ नये. अन्यथा शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागू शकते. मनसोक्त तसंच पेरणीयोग्य पाऊस झाल्यावर पेरणीचा निर्णय घेतला पाहिजे.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT